# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडल, औरंगाबाद.

## प्रकरण क्र. सीजीआरएफ/एझेड/शहर/६१५/२०१७/०८

**(नोदंणी क्रमांक २०१७०२०००५)**

| | | |
|---|---|---|
| तक्रार दाखल | दिनांक :- | ०६.०२.२०१७ |
| निकाल | दिनांक :- | ११.०४.२०१७ |

श्रीमती. सईदा पठाण — तक्रारदार
C/o उपकार्यकारी अभिंयंता,
मराविविकंम, क्लास -४ क्वाटर्स,
३३ के. व्ही. सबस्टेशन, कॅन्टोनमेंट,
औरंगाबाद.
(ग्राहक क्रमांक ४९००१०७८६३४४)

## विरुध्द

कार्यकारी अभियंता (प्रशासन), — गैरअर्जदार
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .
शहर मंडल, औरंगाबाद.

## मंच

| | |
|---|---|
| १ ) डॉ.भास्कर पालवे | अध्यक्ष |
| २ ) श्री. उत्तम.म.उरकुडे | सदस्य / सचिव |
| ३ ) श्री. वि. सु. काबरा | सदस्य |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

अर्जदार श्रीमती सईदा पठाण, C/o. उपकार्यकारी अभियंता, मराविविकंम, क्लास -४ क्वॉटर्स, ३३ के. व्ही. सबस्टेशन, कॅन्टोनमेंट, औरंगाबाद या महावितरणच्या ग्राहक असून महावितरण च्या कर्मचारी आहेत. त्यांनी गैरअर्जदार म्हणजेच, कार्यकारी अभियंता, नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे विरुध्द महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ यातील परिशिष्ट -अ नमुन्यात दिनांक ०६.०२.२०१७ रोजी तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे आहे.

अर्जदार हा महावितरण कंपनीत कनिष्ठ तंत्रज्ञ म्हणुन कार्यरत आहे. त्यांना महावितरणचे निवासस्थान पत्र क्रमांक मुअ/औप/औसंवि/निवासस्थान/१९७३ दिनांक २२.०५.२०१२ नुसार छावणी येथील क्वार्टर क्रमांक ४ चा दिनांक २४.०५.२०१२ रोजी ताबा घेतला असून दिनांक २४.०५.२०१२ रोजी मीटर रिडींग ३६१० होते. तसेच ग्राहक क्रमांक ४९००१०७८६३४४ वीज देयकाची थकबाकी एप्रिल २०१२ अखेर रुपये २१,५६०/- अशी होती. त्यांनी ३६१० मीटर रिडींग पासून पुढे येणाऱ्या वीज वापारावर वीज देयक देण्यात यावे. तसेच अर्जदाराने मंचाकडे खालील प्रमाणे विनंती केलेली आहे.

१) अर्जदाराने ज्या दिवसापासून महावितरणचे निवासस्थान ताब्यात घेतले त्या दिवसापासून वीज बील देण्यात यावे.

२) विज बील अर्जदाराच्या नावाने देण्यात यावे.

३) अर्जदारास आकारण्यात येणाऱ्या वीज बिलावर व्याज व दंड आकारण्यात येऊ नये. कारण अर्जदार योग्य बील दिल्यास वीज बील भरण्यास तयार आहे.

४) अर्जदारास निवासस्थानात पुर्वी राहात असलेल्या भाडेकरुचे वीज बिलासंबंधीची थकबाकी भरण्यास सांगू नये.

५) जो पर्यंत अर्जदारास योग्य बिल देण्यात येत नाही, तो पर्यंत विद्युत पूरवठा खंडीत करु नये .

६) ग्राहकास सुधारीत करुन देण्यात येणाऱ्या वीज देयकावर पुर्वीच्या भाडेकरुंची थकबाकी वीज बिलात दाखवु नये.

**कार्यकारी अभियंता (प्रशासन), नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे म्हणणे.**

अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण, छावणी उपविभाग, औरंगाबाद यांनी त्यांचे दिनांक ०७.०३.२०१७ नुसार खालील प्रमाणे आपले म्हणणे मांडले आहे.

१) अर्जदार श्रीमती सईदा पठाण या महावितरणच्या क्लास-४ च्या क्वार्टर मध्ये दिनांक २२.०५.२०१२ मध्ये रहाण्याकरीता आल्या आहेत. त्यांचा विद्युत जोडणी ग्राहक क्रमांक ४९००१०७८६३४४ या वरील थकबाकी रुपये २२,०६०/- इतकी होती व व्याजाची रक्कम ५३७०/- इतकी होती. त्यामुळे अर्जदारास माहे जून २०१२ पासून ते जानेवारी २०१७ पर्यंत रुपये ९५,७८०/- इतकी रक्कम भरणे आहे. यामधुन व्याजाचे रुपये ७,८३०.१७, डीपीसी ४४१.२० रुपये व वीज बील देयक दुरुस्ती रुपये ८१०.३९ असे एकुण ९,०८१.७६ वजा करुन रुपये ८६,६९८.२४ भरणे आवश्यक आहे.

२) निवाासस्थान आबंटन आदेशामध्ये (क्रमांक १९७३ दिनांक २२.०५.२०१२) विद्युत ग्राहक क्रमांक ४९००१०७८६३४४ चे वीज देयक अर्जदाराचे नावाने काढण्यात यावे असा उल्लेख केलेला नाही. या कारणास्तव अर्जदाराच्या नावे वीज देयक काढता येत नाही.

३) अर्जदार श्रीमती सईदा पठाण यांच्या अगोदरच्या भाडेकरुंची थकबाकी तत्कालीन कर्मचाऱ्यांकडुन दंड व व्याजासहित वसुल करण्यात येईल.

**तसेच दिनांक २९.०३.२०१७ चे निवेदनात खालील प्रमाणे म्हणणे मांडले आहे.**

१) माहे मे २०१२ अखेरची थकबाकी रुपये २२०६०.५४ व त्यावरील फेब्रुवारी २०१७ पर्यंत चे व्याज ७९२२.६६ अशी एकुण रुपये २९९८३.२० ची थकबाकी आहे.

२) माहे मे २०१२ पासून माहे फेब्रुवारी २०१७ पर्यंत एकुण थकबाकी रु. ९६,९७०/- पैकी व्याज रु. ३४८२५.११ आहे. एकुण थकबाकी मधुन माहे मे २०१२ अगोदरची थकबाकी व्याजासहित कमी केल्यास एकुण शिल्लक थकबाकी (९६९७०-२९९८३) रु. ६६९८६.८० आहे ज्यात मुळ थकबाकी रु. ४००८४.३५ व व्याज रुपये २६९०२.४५ आहे.

३) अर्जदाराने तक्रार केल्यानंतरही वीज बील दुरुस्त करण्यात आले नाही म्हणुन कार्यकारी अभियंता, शहर विभाग क्र-१ यांना पत्र क्रमांक ७५२ दिनांक ३०.०३.२०१७ अन्वये माहे मे २०१२ पुर्वी राहणाऱ्या कर्मचाऱ्यांकडुन थकबाकी रुपये २२०६० व फेब्रुवारी २०१७ पर्यंतचे एकुण व्याज रुपये ३४८२५.११ असे एकुण ५६८८५.११ वसुल करण्यात यावी, असे निदर्शनास आणुन देण्यात आले आहे.

तरी मंचास विनंती करण्यात येते की, अर्जदार श्रीमती सईदा पठाण यांना त्यांच्याकडे असणारा थकबाकी रक्कम भरणा करण्यास आदेशीत करावे.

**<u>ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे निष्कर्ष</u>**

१) अर्जदार श्रीमती सईदा पठाण या महावितरणच्या कर्मचारी असून त्या दिनांक २२-०५-२०१२ च्या आदेशानुसार महावितरणच्या निवासस्थानात राहात आहेत व त्यांचा विद्युत जोडणी ग्राहक क्रमांक ४९००१०७८६३४४ असा आहे. त्यांनी दिनांक २४.०५.२०१२ रोजी निवासस्थानाचा ताबा घेतला त्यावेळी सदर ग्राहक क्रमांक वर रुपये २२०६०/- एवढी थकबाकी त्यांच्या पुर्वी या निवासस्थानात राहणाऱ्या कर्मचाऱ्याच्या वीज देयकाची होती.

२) अर्जदाराने मे २०१२ पूर्वीच्या रहिवाशाकडुन थकीत वीज बील वसुली करणेसाठी अर्ज / तक्रार बिलींग उपविभाग छावणी यांचेकडे न करता कार्यकारी अभियंता (स्था), परिमंडल कार्यालय व कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग, औरंगाबाद यांना दिनांक २४.०५.२०१२ चे निवेदनाद्वारे विनंती केली आहे. दिनांक १९.०६.२०१३ चे निवेदन सुध्दा अधिक्षक अभियंता, औरंगाबाद यांनाच दिलेले आहे. दिनांक ०३.१२.२०१४ चे निवेदन अतिरिक्त कार्यकारी अभियंता, छावणी उपविभाग यांना देऊन दिनांक २४.०५.२०१२ रोजी माझे रिडींग ३६१० होते, त्यानुसार बील देण्यात यावे अशी विनंती केली आहे. दिनांक २९.११.२०१६ चे निवेदनावर कोणत्याही कार्यालयाचा पोहोच म्हणुन शिक्का लावलेला नसून फक्त दिनांक ०६.१२.२०१६ ची अस्पष्ट सही आहे.

३) ओरंगाबाद शहर मंडल हे दिनांक ०१.०५.२०११ ते दिनांक १३.११.२०१४ पर्यंत M/s. GTL या कंपनीकडे सुपुर्द करण्यात आले होते. त्या कालावधीत अर्जदाराने त्यांचे बिलींग उपविभागाशी तक्रार केल्याचे व त्यांनी सदरची थकबाकी वसुल केल्याचे निदर्शनास येत नाही.

४) तक्रारदार ग्राहकाचे ग्राहक क्रमांक ४९००१०७८६३४४ वीज देयक दिनांक २५.०१.२०१७ हे तक्रारीसोबत जोडलेले असून त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, एकुण थकबाकी रुपये ९४,५००/- एवढी असून पैसे भरणा केल्याचा मागील पावतीचा दिनांक १९.०३.२००९ असा उल्लेख केलेला आहे. एरवी सामान्य ग्राहकाने एक महिना वीज देयक न भरल्यास वीज कंपनी ज्या तत्परतेने वीज पूरवठा खंडीत करतात ती तत्परता वीज कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या थकीत वीज बिला संदर्भात दाखविली नाही. महावितरणच्या क्वार्टर्समध्ये वास्तव्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे असलेली थकबाकीची व वसुलीची पडताळणी करणे आवश्यक आहे.

५) अर्जदार यांनी दिनांक २४.०५.२०१२ पासून आज पावेतो विजेचा वापर करुन सुध्दा स्वतःहून कोणतीही वीज बिलाची रक्कम भरणा केल्याचे दिसून येत नाही.

६) दिनांक २४.०५.२०१२ पासून M/s. GTL कंपनीने तसेच त्यानंतर दिनांक १४.११.२०१४ पासून महावितरणने थकबाकी वसुलीसाठी कोणतीही कार्यवाही केली नाही अथवा थकीत बिलांसाठी वीज कनेक्शन तोडण्यात आले नाही. वीजेचे देयक भरले जात नाही, हे दिसत असतांनाही वीज जोडणी तोडण्या संदर्भात नोटीस सुध्दा बजावण्यात आली नाही व त्यामुळे कंपनीचे आर्थिक नुकसान झालेले आहे. त्यासाठी संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे.

वरील प्रमाणे अर्जदार, गैरअर्जदार आणि मंचाने काढलेले निष्कर्ष याचा विचार करता मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.



.

# आदेश

१) महावितरणने अर्जदार श्रीमती सईदा पठाण यांना दिनांक २४.०५.२०१२ पासून वापरलेल्या विजेच्या युनिटचे देयक देण्यात यावे व त्याची संपुर्ण वसुली करण्यात यावी. सदर देयकात त्यांच्या पुर्वी राहात असलेल्या कर्मचाऱ्याच्या वीज देयकाची थकबाकी दाखविण्यात येऊ नये.

२) अर्जदार राहण्यास येण्यापुर्वी रहात असलेल्या कर्मचाऱ्यांची वीज देयकाची थकबाकी संबंधीत कर्मचाऱ्यांकडुन नियमानुसार वसुल करण्यात यावी.

३) तक्रारदाराच्या दिनांक २४.०५.२०१२ रोजीच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यामुळे महावितरण कंपनीचे आर्थिक नुकसान झाल्याने संबंधीतावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

४) केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल ३० दिवसात सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | उत्तम.म.उरकुडे | विलासचंद्र.सु.काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य/सचिव |